**अर्जदारतर्फे साक्षीदार क्र. ०१ शपथेवर कथन करतो:**

**उलट तपासणी**

( गैरअर्जदार क्र. १ व २ साठी अतिरिक्त सरकारी वकील श्री. के. डी. कोळपे )

१०. हे म्हणणे खरे नाही की, भूसंपादन करण्यापूर्वी सदर कार्यालयाचे अधिकारी आणि कर्मचारी संपादित करावयाच्या शेतजमिनीवर पाहणी आणि पंचनामा करण्यासाठी आले होते आणि त्यांनी तशी पाहणी करून पंचनामा केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला सदर कायद्यामध्ये नमूद केलेल्या सर्व नोटीस मिळाल्या होत्या. आम्ही भूसंपादन अधिकारी यांच्याकडे परिसरातील शेतीची किंमत दर्शविणारे खरेदीखत दिले होते. मी त्याची पोहोच दाखल करू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी शासनाने पुरेशी संधी दिलेली असतानाही त्यांच्याकडे संपादित करावयाच्या शेतजमिनीचे बाजारू मूल्य दर्शविणारे कागदपत्र सादर केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, संपादन अधिकारी यांनी जो काही मावेजा मंजूर केला तो त्यावेळच्या संपादित जमिनीच्या बाजारभावाप्रमाणे आणि उचित असा नमूद केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आमची संपादित झालेली शेतजमीन जिरायत आणि कमी प्रतिची होती. मी संपादित झालेली शेतजमीन बागायत असल्याचे दर्शविणारी कागदपत्रे अर्जासोबत दाखल केलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद केल्यानुसार कोणत्याही सोयी—सुविधा आमच्या गावामध्ये उपलब्ध नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिज्ञापत्रामध्ये कोणत्याही आधाराशिवाय आमच्या संपादित केलेल्या शेतजमिनीमधून दरवर्षी रुपये ४०,०००/— प्रति एकर उत्पन्न मिळवित होतो आणि त्याचे बाजारू मूल्य प्रति एकर रुपये १,००,०००/— होते, असे सांगत आहे.

११. संपादित केलेल्या शेतजमिनीमध्ये दगडी पोळ आणि

फळझाडे असल्याबाबत ७/१२ उता—यामध्ये नोंद होती. मी तो ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. तो ७/१२ उतारा अतिरिक्त सरकारी वकील यांनी साक्षीदारासमक्ष ठेवला म्हणून त्याला निशाणी क्र. सी/२६ देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, संपादित केलेल्या शेतजमिनीमध्ये कोणतीही पोळ आणि फळझाडे नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेल्या खरेदीखतातील शेतजमीन आणि संपादित केलेली शेतजमीन यांच्यामध्ये सुमारे तीन कि.मी. पेक्षा जास्त अंतर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले खरेदीखत हे संपादित केलेल्या शेतजमिनीशी जुळणारे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा अर्ज दिलेला असून त्याचे खोटे समर्थन करीत आहे.

**फेर तपासणी** — निरंक.

दिनांक: २०.०७.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Date: 2026.07.20 15:28:53 +0530

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.